PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Nanand Bhavajay
Year: 1991

Song: Mayechi Sauli
Lyricist:

हूँ... ओ हो हो...
ला ल ला ल ला
मायेची साऊली
आनंदी बाहूली
आहे गुणाची मोठया मनाची
जाई जशी माझी ताई

आकाश सारे घेऊन तारे
आहे कुणा पाहते रे
माझ्या घराच्या या चांदणीचे
न्याहळती रूप सारे

बहीनीची माया ही
बकुळीची छाया ही

पानांफुलांचे वेली कळयांचे
घेऊनीया प्रेम सारे

वात्सल्य नाते भावास देते
साऱ्या सुखाचे फुलोरे

लाखाच्या मोलाची
प्राणांच्या तोलाची

बाल्यातल्या त्या चिंचा लगोऱ्या
ते खेळूया भांडणे ती
केंव्हा अबोली केंव्हा सलोखा
ती भाबडी गोड नाती

जन्माच्या सौख्याची
आशा ही दैवाची

हो हूँ... माझी ताई
हूँ... हूँ... हूँ...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*